**नियमित दिवाणी दावा क्र. ५८/२०२३ मध्ये निशाणी क्र. ४० वरील आदेश**
**( लक्ष्मी नारायण ऑटो नोंदणीकृत भागिदारी संस्था तर्फे प्रदीप दिनानाथ देसाई –वादी वि. रसिका मोहन वारंग वगैरे –प्रतिवादी )**

१. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहितीचे आदेश ७ नियम ११ अन्वये दावा रद्द करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथने अशी आहेत की, वादीने दाव्यास कारण लिहिलेले आहे ते स्पष्ट नाही. वादीने दावा मिळकती म्हणून 'अ' व 'ब' परिशिष्टातील मिळकती नमुद केलेल्या आहेत. वादीचे म्हणणे प्रमाणे 'अ' परिशिष्टातील मिळकत ही वादीचे मालकीची असून 'ब' परिशिष्टातील मिळकत ही प्रतिवादीच्या मालकीची मिळकत आहे . वादीने दाव्याचे कारण लिहिताना प्रतिवादी यांनी १० ते १२ इसमांसह दावा मिळकतीमध्ये घुसुन धार्मिक कार्यक्रम सुरु केले असे नमुद केले आहे , परंतु कोणत्या मिळकतीमध्ये धार्मिक कार्य केले याबाबत दाव्यास कारण मध्ये काही नमुद नाही. सबब दाव्यास कारण स्पष्ट नाही. सबब वादी यांचा दावा फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

३. वादी यांनी नि. ४२ वर आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने स्पष्टपणे नाकारलेली आहेत . वादीचे कथन असे आहे की , प्रतिवादीने कोणत्या मिळकतीमध्ये धार्मिक कार्यक्रम केले हा वादाचा विषय नसुन प्रतिवादीने दावा मिळकत 'अ' मध्ये अतिक्रमण करुन बेकायदेशीर बांधकाम केलेले आहे असे वादीचे दाव्यामध्ये कथन आहे. त्याबाबतचे निराकरण दाव्याचे कामी होणे आवश्यक आहे . वादीने धार्मिक कार्याबाबत दाव्याचे कारण लिहिताना नमुद केले नाही म्हणून वादीचा दावा फेटाळता येणार नाही. धार्मिक कार्याबाबत वादीने स्पष्टीकरण देण्याची गरज नाही. सबब अर्ज नामंजूर करावा अशी वादींनी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणात खाली नमूद मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमूद कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तुत दावा रद्द होणेस पात्र आहे काय? | नाही. |
| ०२. | आदेश काय? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत:–**

६. प्रतिवादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की , दाव्यातील परिच्छेद क्र.४ दाव्यास कारण या कलमामध्ये केवळ दिनांक १/५/२०२३ रोजी प्रतिवादीने १० ते १२ इसमांसह दावा मिळकतीमध्ये घुसुन धार्मिक कार्यक्रम सुरु केले असे नमुद आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये दोन दावा मिळकतींचा उल्लेख असून सदर दावा मिळकतीपैकी 'अ' मिळकत ही वादी यांचे मालकीची असून 'ब' मिळकत ही प्रतिवादी यांचे मालकीची आहे. सदर दोन दावा मिळकतीपैकी कोणत्या दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी धार्मिक कार्यक्रम सुरु केले याचा उल्लेख केलेला नाही . सबब त्यांनी अशी विनंती केली की , दाव्यास कारण स्पष्ट नसलेमुळे वादीचा दावा दिवाणी प्रक्रीया संहिताचे आदेश ७ नियम ११(अ) प्रमाणे रद्द करावा.

७. वादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा दावा हा कायम व आज्ञार्थी ताकीदीकरीता असून दावा परिच्छेद कलम ३ मध्ये दिनांक १ /५/२०२३ रोजी प्रतिवादी बेकायदेशीरपणे 'अ' दावा मिळकतीमध्ये घुसले व धार्मिक कार्यक्रम करु लागले असे नमुद आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

८. कायद्याचे प्रस्थापित तत्वानुसार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०७ नियम ११ प्रमाणेचा अर्ज विचारात घेताना फक्त दाव्यामध्ये केलेली कथनेच पहाणे आवश्यक आहे.

९. दाव्याचे अवलोकन केले असता वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाईची ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे . प्रस्तुत दाव्यामध्ये दावा परिच्छेद कलम ३ मध्ये असे स्पष्टपणे नमुद केले आहे की, दिनांक १/५/२०२३ रोजी प्रतिवादी १० ते १२ व्यक्तींच्या जमावासह बेकायदेशीरपणे 'अ' दावा मिळकतीमध्ये घुसले व दावा मिळकतीच्या पूर्व हद्दीवर धार्मिक कार्यक्रम करु लागले. दाव्यातील सदर कथनांचा विचार करता वादींनी दाव्यास घडलेले कारण स्पष्टपणे नमुद केलेले आहे . तसेच विनंती कलमामध्ये प्रतिवादी यांनी 'अ' दावा मिळकतीमध्ये अनाधिकारे प्रवेश करुन कोणतेही बांधकाम करु नये अशी कायम मनाई ताकीदीची मागणी केलेली आहे . या सर्व बाबींचा विचार करता दाव्यास कारण नमुद केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सबब मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष '' नकारार्थी '' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत:-</u>**

१०. वर नमूद स्पष्टीकरण व मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष लक्षात घेता, अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सदर अर्जाचे खर्चाबाबतचा विचार अंतिम निर्णयाचे वेळी करण्यात येईल.

सही/-

दिनांक:- ३०/०१/२०२४

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कुडाळ